

# Vasantrao Kale Mahavidyalaya, Dhoki.

Tq. & Dist. Osmanabad

Affilated to Dr. Babasaheb Ambedkar Marathawada University, Aurangabad.


*And*

## ICSSR Sponsored

*National Level Seminar in Inter Disciplinary Subject.*

*on*

# WOMEN EMPOWERMENT ISSUES AND CHALLENGES








Chief Editor :
- Dr. Haridas Fere
Principal

Editor :
- Dr. Jyoti Nade
Convenor

| | | | |
|---|---|---|---|
| ६२. | महिला सबलीकरणात 'तिची वाटच वेगळी' साहित्यकृतीची भूमिका | - डॉ. डिगोळे बी. व्ही. | १६७ |
| ६३. | महिला सबलीकरण : संयुक्त राष्ट्र संघटना आणि भारतीय संविधान | - प्रा. डॉ. जगदीश देशमुख | १६९ |
| ६४. | महिला आणि मानवी हक्क | - प्रा. शिंदे पी. आर. प्रा. शेख एम. आय. | १७२ |
| ६५. | महिला सक्षमीकरण आणि मानवी हक्क | - डॉ. बंजारा दिलीप लाल | १७४ |
| ६६. | भारतीय संविधान आणि आदिवासी महिला सक्षमीकरण | - प्रा. कौनेरू डुमलवाड | १७६ |
| ६७. | महिला सक्षमीकरण आणि महिला विषयक कायदे | - प्रा. सौ. शर्मिष्ठा शरद लोमटे | १७८ |
| ६८. | महिलाविषयक कायदे आणि स्थिती | - प्रा. काशीद एस. व्ही. | १८२ |
| ६९. | "महिलांविषयक कायदे व महिला सक्षमीकरण" | - प्रा. भिमाशंकर मधुसूदन डहाळके | १८५ |
| ७०. | ग्रामीण भागातील नोकरी न करणाऱ्या स्त्रियांचा कायद्याच्या जागरुकतेविषयीचा अभ्यास | - प्रा. चवरे अर्चना कुंडलिकराव | १८७ |
| ७१. | महिलांविषयक कायदे | - प्रा. राणी जाधव (गायकवाड) | १८९ |
| ७२. | महिलाविषयक विविध कायदे आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. मुसळे आनंद रामदास | १९१ |
| ७३. | महिलांविषयक कायदे | - प्रा. डी. एम. शिंदे | १९४ |
| ७४. | महिलांविषयक कायदे | - डॉ. स्मिता काशिनाथराव मलवाडीकर | १९७ |
| ७५. | महिलाविषयक कायदे व योजना | - डॉ. एस. बी. अष्टुरे - कु. एम. यु. मुरगे | २०० |
| ७६. | महिला सक्षमीकरण - कायदे व उपाययोजना | - डॉ. वितेश भारत निकते | २०२ |
| ७७. | पंचायतराज आणि महिला नेतृत्व | - डॉ. बाजीराव वडवळे, डॉ. पी. व्ही. गड्डपवार | २०४ |
| ७८. | महिलासंबधी कायदे आणि भारत | - प्रा. राजेश कचरु गायकवाड | २०५ |
| ७९. | स्थानिक स्वराज संस्था आणि महिला सक्षमीकरण | - डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव | २०७ |
| ८०. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. आघाव श्रीधर सोनराव | २०९ |
| ८१. | "ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन महिला सबलीकरण" | - प्रा. डॉ. अकोलकर आशा दगडु | २११ |
| ८२. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. डॉ. कदम डी. एम. | २१३ |
| ८३. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. संजय संदीपान चव्हाण | २१५ |
| 84. | महिला सक्षमीकरणातील प्रथम पाऊल – स्त्री भ्रूणहत्याबंदी कायदा (अंमलबजावणी व फलश्रुती) | - प्रा. डॉ. चंद्रशेखर इं. गित्ते | २१६ |
| ८५. | जिल्हा महसूल प्रशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास | - प्रा. डी. बी. जाधव | २२० |
| ८६. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. डॉ. क्षीरसागर डी. डी. | २२३ |
| ८७. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. शामराव महादेव लेंडवे | २२५ |
| ८८. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. सौ. कविता चंद्रकांत लोहाळे/ताटे | २२७ |
| ८९. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. निलंगेकर शरण शिवरूद्रप्पा | २३१ |
| ९०. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. रासवे दिनकर सुदामराव | २३३ |
| ९१. | पंचायतराज आणि महिला विकासाच्या योजना | - प्रा.दत्ता खरटमोल | २३५ |
| ९२. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. फुलारी ज्योती महिशंकर | २३७ |
| ९३. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सबलीकरण | - वर्षा भूषण कांबळे | २३८ |
| ९४. | शासकीय योजना आणि महिला सक्षमीकरण | - प्रा. डॉ. सोमवंशी मुक्ता गोविंदराव | २४० |
| ९५. | शासकीय योजना आणि महिला सक्षमीकरण | - डॉ. सौ. रश्मी राजेंद्र गोसावी | २४२ |

# महिलांविषयक कायदे

**प्रस्तावना :**

हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा असणाऱ्या देशात आजही स्त्रीयांना गुलामीत जीवन जगावे लागत आहे. भारतीय समाज पुरूष प्रधान आहे. भारतात पुरातन काळापासुन पितृसत्ताक कुटूंब अस्तित्वात आहेत. अशा कुटूंबात व एकुणच समाजात पुरुषांना अनेक प्रकारचे अधिकार आहेत. परंतू स्त्रीयांना मात्र या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. स्त्रीयांना या अन्याय अत्याचार व गुलामीतून बाहेर काढण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केलेले आहेत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भारतीय राज्यघटनेव्दारे महिलांना संविधानात पुरुषांच्या बरोबरीने मुलभूत हक्क आणि स्वातंत्र्य दिलेले आहे. आज महिला अनेक उच्च पदांवर कार्य करत आहेत. तरी देखील त्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येत नाही. देशातील समान कामासाठी समान वेतन ही मिळत नाही. कुटूंबामध्येही त्यांना अत्याचाराला बळी पडावे लागते अशा महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी किंवा त्यांच्या संरक्षणासाठी कोणते कायदे अस्तीत्वात आहेत त्याचे स्वरुप कसे आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. यासाठी महिलांचे कायदेशीर अधिकार याविषयी अभ्यास करण्याची गरज आहे. हा अभ्यास करतांना पुढील उदिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करण्यात आला.

**संशोधनाची उदिष्ट्ये :**

१) महिलांसाठी संविधानाने निर्माण केलेल्या विविध कायद्यांचा अभ्यास करणे.

२) महिलांमध्ये कायदयाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला यात पुस्तके, मासिके, अहवाल इंटरनेट, वृत्तपत्रे इ. चा समावेश आहे.

**महिलांविषयक कायदे :**

आधुनिक काळात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तसेच मानवाच्या नीतीमूल्यातील घसरणीमुळे महिलांचे वंदनीय अवस्थेतून दयनीय स्वरुपात परिवर्तन झालेले दिसत आहे. त्यामुळे दररोज घडत असणाऱ्या स्त्री अत्याचाऱ्याच्या घटना आपण बघत असतो. ज्या घरात ती स्वतः सुरक्षीत समजते त्याच घरात ती विविध अत्याचाराला बळी पडते तसेच घराबाहेर पडल्यानंतरही तिला बऱ्याच अत्याचाराला बळी पडावे लागते या सर्व अत्याचारापासून संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी आजपर्यंत खाली दिले गेलेले कायदे अस्तित्वात आहेत.

**१) हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८५६ :**

भारतीय समाजात पूर्वी मुलींचे लवकर लग्ने होत असत. बऱ्याच वेळी लग्न म्हणजे काय हे समजण्यापुर्वीच त्यांच्या पतीचे निधन होत असे व त्यांना विधवा म्हणून जीवन जगावे लागे. विधवा महिलांकडे पाहणे अशुभ मानले जाई तसेच त्यांच्यावर अनेक प्रकारचे अत्याचार होत असत. महाराष्ट्र व बंगालमध्ये समाजसुधारकांनी प्रयत्न करून विधवा पुर्नविवाहाचा प्रश्न सोडवला इ. स. १८५६ साली विधवा पुर्नविवाहाचा कायदा अस्तित्वात येवून अशा महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी कायद्याची मदत झाली.

**२) सति प्रथा प्रतिबंध कायदा १८२९ :**

इ. सन १८२९ साली राजाराममोहनरॉय यांच्या प्रयत्नामुळे सतीप्रथा प्रतिबंध कायदा लॉर्ड बेंटिंग या इंग्रजी अधिकाऱ्याने पास केला. त्यामुळे पती निधनानंतर त्यांच्या चितेवर प्राण दयावा लागणाऱ्या महिलांच्या या जाचक रुढीतून मुक्तता झाली व त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी हा कायदा फायदेशीर झाला.

**३) हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ :** समाजामध्ये हुंडा देणे ही अत्यंत घातक अशी प्रथा निर्माण झालेली आहे या प्रथेमुळे अनेक महिलांचे आयुष्य उध्वस्त झाले आहे. याला आळा घालण्यासाठी हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ अस्तित्वात आला आहे. प्रत्येक पोलिस स्टेशनला हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. राज्यात २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदी दिन म्हणुन साजरा केला जातो.

**४) हिंदू विवाह कायदा १९५५:**

हिंदू विवाह कायदा हा हिंदू धर्मांचे पालन करणाऱ्या व्यक्तीस लागू आहे शिवाय वीरशैव, बौध्द जैन, शिख,ब्राम्हो व आर्य समाज या अनुयायींना हा कायदा लागु आहे. ज्या समाजासाठी स्वतंत्र विवाह कायदे अस्तित्वात आलेले आहेत. तसेच ज्या हिंदूचे विवाह हे स्पेशल मॅरेज ॲक्टनुसार केले जात नाहीत त्यांना हा कायदा लागू होतो.

**५) बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२६ :**

बालविवाहामुळे होणाऱ्या दुष्परिणामांचे गांभिर्य लक्षात घेवून विवाहसाठी मर्यादा असावी म्हणून या कायदयाची निर्मिती झाली. १९२६ साली या कायद्यानुसार १५ वर्षे वयाच्या आतील मुलींचे १८ वर्षे वयाच्या आतील मुलांशी विवाह करणे कायद्याने गुन्हा मानन्यात येत असे. १९५४ साली कायदयात सुधारणा करून विवाहासाठी मुलाचे वय २१ वर्षे व मुलीचे वय १८ वर्ष करण्यात आले.

**६) हिंदू दत्तक व निर्वाह कायदा १९५६ :**

ज्या महिलेला स्वतःचे मूल नाही अशा महिलांना एखादे मुल दत्तक घेवून आपला निर्वाह चालविणाऱ्या अधिकारासाठी या कायदयाची निर्मिती झाली.

**७) स्त्रीयांचा संपत्तीचा कायदा १९५६ :**

एकेकाळी कौटूंबिक मालमत्तेत मुलीला काही वाटा नव्हता मुलगा हा कौटूंबिक मालमत्तेचा वारसा मानला जात असे. १९५६ च्या या कायद्यानुसार कुटूंबाची मालमत्ता वडीलांनी मिळवलेली मालमत्ता यांत त्यांच्या पत्नीला तसेच मुले मुली यांना समान वाटा देण्यात आला आहे.

**८) देवदासी प्रतिबंधक कायदा :**

राज्यात देवदासी प्रतिबंधक कायदा मंजूर करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे देवदासी व त्यांच्या मुलांचे पुनर्वसन, शिक्षण, आरोग्य आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाचे मार्ग प्रशस्त करण्याच्या दृष्टिने हा कायदा उपयुक्त ठरत आहे.

**९) घटस्फोट कायदा १८६९ :**

हिंदू विवाहाला कायद्याने घटस्फोटाला कायदेशीर मान्यता मिळवून दिलेली आहे. पती पत्नी काही कारणाने ते एकमेकांसोबत राहत नसले तर न्यायालयात जावून घटस्फोट घेवू शकतात. महिला पुढील परिस्थीतीत घटस्फोट

घेवू शकते. मानसिक व शारीरिक छळ, व्यभिचार, मानसिक आजारपण, पती सात वर्ष बेपत्ता असणे, संन्यास घेणे, लैंगिक आजारपण, गुप्त रोग इ.

**१०) समान वेतन कायदा १९७६ :**

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून घोषीत करण्यात आले होते. स्त्रीयांना समान कामासाठी समान वेतन असावे त्यासाठी हा कायदा करण्यात आला. एका कार्यालयात,कारखान्यात इ. ठिकाणी एकाच प्रकारचे काम करणाऱ्या स्त्री पुरुषामध्ये कोणताही भेदभाव न करता समान वेतन देणे बंधनकारक ठरले.

**११) स्त्रीयांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंधक कायदा १९८६ :**

या कायदयाने स्त्रिला जाहिराती पुस्तके, पोस्टर्स याव्दारे स्त्रीयांच्या शारीरिक अंगाच्या अश्लिल प्रदर्शनावर प्रतिबंध घालण्यात आला. आशा प्रकारच्या अपराधारासाठी शिक्षा आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यामुळे अंगप्रदर्शनाला काही प्रमाणात मर्यादा आल्या आहेत.

**१२) कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ :**

महिलांना कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण नियम २००६ दिनांक २६. १०. २००६ पासुन अंमलात आला. महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापून संरक्षण करण्यासाठी हा कायदा क़रण्यात आला या कायदयामुळे महिलांना शारीरिक अत्याचार, लैंगिक,भावनीक,आर्थिक अत्याचारापासून संरक्षण दिले आहे.

**१३) अनैतिक देह व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ :**

या कायदयाने स्त्रीच्या अनैतिक देह विक्री करण्यास बंदी घातली. या कायदयात १९७८ व १९८६ साली सुधारणा करण्यात आली. स्त्रीयांचे लैंगिक शोषण, वेश्यागृह चालविणारी व्यक्ती अवयस्कर बालिकांना अनैतिक व्यापारात ढकलणारी व्यक्तीला कठोर शिक्षा या कायदयाव्दारे करण्यात येते.

**१४) गर्भपात प्रतिबंध कायदा १९२९ व गर्भलिंग परिक्षण कायदा १९७१ :**

भारतात मुलींचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे या वर नियंत्रण आणण्यासाठी गर्भपाताचा व गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायदा करण्यात आला. या कायदयाची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु आहे. यातील सर्व गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र करण्यात आले आहेत. या कायदयान्वये गर्भातील लिंग तपासणी करण्याऱ्या व्यक्तीला आणि अशी तपासणी करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकला दंड आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. २००२ मध्ये यात सुधारणा करण्यात आली.

**१५) राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९० :**

या महिला आयोगावर एक अध्यक्ष व पाच सभासद असतात हे सदस्य विविध क्षेत्रातून आपल्या क्षमतेच्या बळावर पुढे आलेल्या महिला असतात. याशिवाय या आयोगावर केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या व्यक्ती सभासद सचिव असतो. या कायदयान्वये राज्यघटना व इतर कायदयांनी स्त्रियांच्या संरक्षणाकरीता ज्या तरतूदी केलेल्या आहेत त्या संबंधीत उपस्थित होणाऱ्या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाते.

**१६) स्त्रीभ्रुणहत्या कायदा १९८८ :**

देशातील महाराष्ट्र पहिले राज्य आहे जिथे प्रसुतीपुर्व गर्भलिंग निवड व गर्भलिंग ओळख थांबविण्यासाठी ११८८ साली महाराष्ट्र रेग्युलेशन ॲक्ट ऑफ प्रिनेटल डायग्नोस्टीक टेक्नीक्स ॲक्ट हा कायदा लागू करण्यात आला. राष्ट्रीय पातळीवर प्रसुतीपुर्व निदान तंत्र कायदा २० सप्टेंबर १९९४ साली पास झाला त्याव्दारे गर्भवती स्त्रीला किंवा तिच्या नातेवाईकांना किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला तिच्या गर्भातले लिंग तोंडी सांगणे, थेट किंवा अप्रत्यक्ष... अन्य मार्गाने सांगणे हा कायदयाखाली दंडनीय गुन्हा ठरविण्यात आला... या वरील कायदयाशिवाय आणखी काही कायदे अस्तित्वात आहेत... प्रमाणे -

१) व्दिभाषा प्रतिबंधक कायदा-१९५६
२) पोटगी कायदा-१९५६
३) बलात्कार प्रतिबंधक कायदा १९८३
४) प्रसुती लाभाचा कायदा १९६१
५) मुस्लीम घटस्फोट कायदा १९३९
६) मुस्लीम स्त्रीयांचा मालमत्ता व वारसा हक्क कायदा
७) ख्रिश्चन स्त्रीयांचे मालमत्ता व वारसा हक्काचा कायदा
८) छेडछाड प्रतिबंध कायदा १९७८
९) कुटूंब न्यायालय कायदा १९८४
१०) कारखाने कायदा १९४८, खाण कायदा १९५२ इ.

अशा प्रकारे भारतात कायदयाच्या माध्यमातून स्त्रीयांना प्राप्त... अधिकार, शासन स्तरावरील विषेश प्रयत्न आणि त्यांच्या विषयी वाढत... जाणीव जागृती यामुळे भारतीय स्त्रीयांच्या जीवनात बदल होतांना दिसत...

**निष्कर्ष :**

राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर स्त्री विकासाच्या उपाययोजना राबविल्या जात असतांनाच हुंडाबळी, बलात्कार, प्रसुतीपुर्व गर्भ लिंग निदान चाचणी, घटस्फोट,गर्भपात इ. समस्यांनी स्त्रीयांच्या जीवनात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी महिलांविषयक तयार करण्यात आलेल्या विविध कायद्यांचा उपयोग होवू शकतो यासाठी आवश्यकता आहे. प्रत्येक कायदयाची प्रभावी अंमलबजावणी होणे आणि महिलांविषयक कायदयाची माहिती व प्रसार समाजातील सर्व स्तरातील महिलांमध्ये करणे. जर वरील सर्व कायदे अत्याचारग्रस्त स्त्रीपर्यंत कार्यक्षमतेपणे पोहचले तर स्त्रीयांचे मानवी हक्क व समाजनिर्मितीतील तिचे स्थान नक्कीच या कायदयामुळे बळकट होईल.

**संदर्भ सूची :**


१) भारताचे संविधान-शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
२) ॲड. देशमुख अरुण, मानवी हक्क आयोग, मनोरमा प्रकाशन,मुंबई २०१०
३) संपादक डॉ. जया सागडे-स्त्री न्याय कायदा
४) प्रा. सी. टी. कांबळे, प्रा. टी. एस. पवळे-भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा, क्रिएटीव्ह पब्लोकेशन,नांदेड -२०१०.
५) डॉ. ए. एन. अग्निहोत्री- महिला सशक्ती और कानून
६) गुप्ता मंजू, गुप्ता सुभाषचंद्र-भ्रुणहत्या और महिलाएँ, अर्जुन पब्लिकेशन हाऊस नई दिल्ली-२००९.
७) गुडघे घ. ग. भारतीय सामाजिक समस्या, संकेत प्रकाशन अमरावती २००८.
८) युसुफ बेन्नुर,रेणुका कड, स्त्रीयांचे संवैधानिक हक्क व जागतिक कायदे कौशल्य प्रकाशन हडको, औरंगाबाद-२०११.
९) रोडे पुष्पा, महिलांसाठी आधार कायदयाचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे
१०) www. gov. ofindia. in.



**- प्रा. राणी जाधव** (गायकवाड)
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर...